त्या सुंदर

यात्रेसाठी

इंद्रपुरी
सिक्कीम

शैलेश पुरोहित
नरेंद्र गोळे

इंद्रपुरी सिक्कीम

शैलेश पुरोहित

नरेंद्र गोळे

ई साहित्य प्रतिष्ठान

इंद्रपुरी सिक्कीम

लेखक

शैलेश पुरोहित

नरेंद्र गोळे

ई-पुस्तक निर्मिती आणि प्रकाशन

ई-साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

दूरध्वनी : 9869674820

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई–पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

©esahity Pratishthan® 2014

गंगटोक

लेखक : शैलेश पुरोहित

ई मेल : shain_p@rediffmail.com

दूरध्वनी : 9870990743

ए/२, जस्मिन को ऑप हाउसिंग सो.

संत रामदास मार्ग (विस्तारित)

मुलुंड (पूर्व),

मुंबई ४०० ०८१

छायाचित्रे : शैलेश पुरोहित, स्वराली पुरोहित

या प्रवासवर्णनातील मजकूर, त्याचा भाग किंवा फोटो यांचा इतरत्र कुठेही वापर करण्यापुर्वी श्री. शैलेश पुरोहित यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

या प्रवासवर्णनातील अनुभव हे लेखकाचे प्रामाणिक अनुभव असून त्यात कोणाचीही जाहिरात किंवा बदनामी करण्याचा हेतू नाही.

या लेखाबद्दल आपली मते जाणून घेण्यास लेखक उत्सुक आहेत.

गंगटोक

शैलेश पुरोहित

१

२०१२ जानेवारीच्या शेवटालाच आम्ही [मी (शैलेश), माझी पत्नी (श्रावणी), मुलगी (स्वराली), मुलगा (गंधर्व) तसेच माझा साडू हेमंत वेलणकर व त्याची पत्नी उल्का] अशा सहा जणांचे दिवाळीच्या सुट्टीत सिक्कीमला जायचे ठरले, सिक्कीम हे निसर्गाची देणगी लाभलेले छोटेसे राज्य, परंतु पर्यटनाच्या दृष्टीने त्याचेही पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण असे चार भाग होतात. एका आठवड्यात संपूर्ण सिक्कीम पाहणे अशक्य असल्याने पूर्व सिक्कीमस्थित गंगटोक व बैगुनीला जायचे ठरवले व सिक्कीम बद्दल विविध माहिती गोळा करण्याच्या कामाला लागलो. नंतर लक्षात आले की एका सप्ताहात, आम्ही एकतर बैगुनी व आसपास पाहू शकू अथवा गंगटोक. अखेर दोन्हीचा चार्ट समोरासमोर ठेऊन गंगटोकची निवड केली. विमानाची तिकीट तसेच गंगटोक येथे राहण्यासाठी हॉटेल, रिसोर्टचा शोध सुरु झाला. बऱ्याच हॉटेलना ई-मेल लिहून बरीच घासाघीस केली. अखेर हेमंत, क्लब-महिंद्रचा सभासद असल्याने त्यांचेच रॉयल-डामेझोंग-रिसोर्ट नक्की केले. असो. गंगटोक समुद्रसपाटीपासून ५,५०० फूट उंचीवर. तेव्हा थंडीचे कपडे वगैरे (मागील दिवाळीत आम्ही उत्तराखंड मध्ये ‘नौकुचीआताल’ येथे गेलो होतो तेव्हा गरम कपडे होतेच) व इतर गोष्टींची खरेदी झाली.

सिक्कीमला जायचे दोन हवाई मार्ग आहेत एक मुंबई-दिल्ली-बागडोग्रा (हे पश्चिम बंगाल मध्ये) व तेथून रस्त्याने गंगटोक व दुसरा, मुंबई-कलकत्ता-बागडोग्रा (कलकत्याहून रेल्वेने सिलीगुडीपर्यंत येऊन मग रस्त्याने सुद्धा जाता येते). चार नोव्हेंबरला दुपारी दिल्लीहून बागडोग्राला जायला निघालो. तेव्हा एकंदरीतच सिक्कीमच्या भूमीवरती केव्हा उतरतोय असे झाले. विमान लखनौच्या पुढे गेल्यावर हिमालयाची रांग दिसली तर पाटणा ओलांडल्यावर कांचनगंगाच्या हिमशिखरांनी दर्शन दिल्यावर, आम्ही सारे खूपच ‘एक्साईट’ झालो.

कांचनगंगा, विमानातून

मोमो, चौमिन, तुप्पा, बांबू-शूट-राईसचा आस्वाद घेण्यासाठी आम्ही खूप आतूर झालो साडेबाराच्या सुमाराला बागडोगरा विमानतळावर उतरलो तिथून गंगटोक १२२ कि.मी. दूर, तेव्हा आम्ही लगेच आमची मुंबई-पुणे-नाशिकची अडीच तासाची फुटपट्टी लावली तर ड्रायव्हरने

कमीतकमी पाच तास लागतील असे सांगत, आमची हवाच काढून घेतली. तिस्ता नदीला कधी डावीकडे तर कधी उजवीकडे ठेवत, साधारण तीनच्या सुमारास आम्ही रांग्पो मार्गे सिक्कीममध्ये प्रवेश केला. रांग्पो चेकपोस्ट जवळ येताच चालकाने आम्हाला आपापले फोटो आयडी हातात ठेवायला सांगितले, चेकपोस्टचा कर्मचारी गाडीत डोकावला, आम्हा सहा जणांचे चेहऱ्यावर लिहिलेले 'मुंबई' कोठून वाचले कुणास ठाऊक इतर काहीही न विचारता - पाहता 'बोम्बाय? जाव', असे उद्गारला व ड्रायव्हरसकट आम्ही सगळेच चकित झालो. रांग्पो सीमेवर मोमो दिसताच, मी व गंधर्वने मोमोवर ताव मारला, मोमोज म्हणजे तांदळाची पिठी गोलाकार लाटून आत व्हेज असल्यास कोबीचे अन्यथा चिकन, मटणाचे स्टफिंग करून करंजीचा आकार देऊन उकडतात. व्हेज मोमोस स्वादिष्ट चटणीमुळे सुसह्य वाटले.

मोमो

पुढे रस्ता एवढा खराब होता, साडेचारच्या सुमारास आम्हाला घेऊन जाणाऱ्या इनोव्हाच्या टायरने दगा दिला. अखेर मजल-दरमजल करत आम्ही संध्याकाळी (खरे म्हजे रात्रीच, कारण संध्याकाळी पाच-साडेपाचलाच, आपल्याकडे आठ साडेआठला जसा अंधार पडतो तसा काळोख झाला) पावणे सातला कुडकुडत रिसोर्टला पोहोचलो. रिसोर्टच्या स्वागतिकेने आमचे स्वागत सिक्कीमी पद्धतीने केले. तर सकाळी घाम पुसत मुंबई सोडताना उगवलेल्या दिवसाचा शेवट असा कुडकुडत झाला. दिवसभरच्या प्रवासाने आम्ही खूप थकलो होतो तेव्हा गरम गरम जेऊन साडेआठ वाजताच सारे निद्रादेवीच्या अधीन झालो ते दुसऱ्या दिवशी पाचला उठलो.

सकाळीच रिसोर्टच्या ट्रॉव्हल-डेस्ककडे नथुला पासला जाण्यासाठी लागणाऱ्या परमिटसाठी लागणारी कागदपत्रे व फोटो दिले तिकडेच गेला आठवडाभर खराब हवामानामुळे नथुलाचा रस्ता बंद असल्याचे शुभवर्तमान समजले. मग आम्ही न्याहारी करून गणेश टोक, हनुमान टोक, फ्लावर-शो व रोप-वे ला जाण्याचा निर्णय घेतला. ताशी व्ह्यू-पोइन्ट वरून कांचनगंगा दिसते असे समजल्यामुळे मी, स्वराली व हेमंत आपापले कॅमेरे सरसावून वरती पोहोचलो,

पाहतो तर आमच्या व कांचनगंगा मध्ये धुकं व ढगांनी आधीच छानसा पडदा धरून ठेवला होता, तो काही दूर होण्याची चिन्ह दिसेना अखेर फ्लावर-शो कडे वळलो.

फ्लॉवर-शो मधली काही दुर्मीळ फुले

साधारणतः मार्च महिन्यात ऑर्किड बहरतो तेव्हा उत्तर सिक्कीममधील फ्लावर-शो पाहण्यासारखा असतो. असो. ह्या शो मध्ये एका मोठ्या ग्रीन हाउसमध्ये शेकडो प्रकारची फुलझाडे आहेत. काही औषधी तर काही शोभेची. १५-२० मिनिटात बाहेर यायच्या उद्देशाने शो पाहायला गेलेलो आम्ही, ४५ मिनिटे झाली तरी बाहेर येत नव्हतो. अखेर बाहेरचा गार्ड सुद्धा डोकावून गेला. खरंच नोव्हेंबर मध्ये सिझन नसताना इतकी अप्रतिम फुलं होती तर मार्चमध्ये निसर्गाचे खरे रूप पाहायला किती मजा येईल ह्याची कल्पना करीत आम्ही बाहेर आलो. उत्तर सिक्कीममध्ये मार्च-एप्रिल महिन्यात 'ऑर्किड फेस्टिवल' भरते ते पाहण्यासारखे असते. तेथून लगेच सिक्कीम विधानसभा बाहेरुनच (कारण दिवाळीची सुट्टी असल्याने) पाहून रोप-वे ने गंगटोकचा एरीअल व्हू पाहायला गेलो.

गंगटोकचा रोप-वे

सिक्कीम मध्ये भाऊबीजेच्या दिवशी बहिणीच्या घरी भाऊराया जातात व बहिणी त्यांचा हारतुरे देऊन सत्कार करतात. असेच काही भाऊराया दिसले त्यांच्यापैकी काहींना फोटो काढू काय? असे विचारले, तेव्हा त्यांनी 'कहासे आये हो?' असा प्रतिप्रश्न केला, 'मुंबई' से म्हणताच अनेकांनी फोटोला पोजेस वगैरे दिल्या.

भाऊराया. एका बांबू मध्ये शूट राईस, व तो सर्व्ह करताना

रोप-वेच्या जवळच हॉटेल डायनेस्टी मध्ये पोट-पूजा करायला जाताच तिथल्या वेट्रेसने छोट्याशा पारदर्शक काचेच्या वाट्यांतून चायनीज ग्रीन-टी कॉम्प्लिमेंटरी म्हणून पुढे केले, त्या कडवट पेयापेक्षा आपला अगदी बिन-साखरेचा चहा मला तरी खूपच उजवा वाटला. लोकल डिश म्हणून बांबू-शूट-राईस मागवला. बांबू-शूट-राईसची रेसिपी देत बसत नाही. गरमागरम बांबू-शूट-राईस खाऊन तृप्तीची ढेकर देत बाहेर आलो. सिक्कीममध्ये रस्ते खूपच स्वच्छ दिसले. वाहतुकीचे नियम पाळणारे चालक पाहून तर, आपण भारतातच आहोत काय असा प्रश्न पडतो. तिथल्या वाहतूक पोलिसाला रस्त्याच्या मधोमध नव्हे तर चौकाच्या कोपऱ्यात उभे राहून वाहतुकीचे नियमन करताना पाहणे केवळ अवर्णनीय असेच. अखेर थकून भागून पुन्हा साडे पाच सहाच्या सुमारास रिसॉर्टवर परतलो.

दुसऱ्या दिवशी पुन्हा ट्रॅव्हल-डेस्क-ला गेलो व नथुला पासचे परमिट आले काय पहिले, पुन्हा एक नकार घेऊन परतलो, हरकत नाही. हिमालयन झू पाहण्यास जाऊया असे म्हणत हिमालयन झुओलॉजीकल पार्क पाहायला गेलो, सदर पार्क २०५ हेक्टर्स वर पसरले आहे. आशियाई ब्लॅक-बेअर पाहत असताना समोर पाहतो तो काय? ध्यानीमनी नसताना कांचनगंगाची शिखरे उभी. किती फोटो काढू अन् किती नको असे झाले. सिक्कीमचा प्रसिद्ध रेड पांडा, क्लाऊडेड-लेपर्डने छान पोझेस दिल्या परंतु स्नो-लेपर्ड काही दिसायला तयार नाही. अखेर दोन अडीच तासाच्या तंगडतोडी नंतर झू मधून बाहेर पडलो व रूमटेक मोनॅस्ट्री, जी गंगटोकपासून २४ किलोमीटर वर आहे, पहायला कूच केले.

(वाघोबांनी दिलेली एक पोज आणि समोरच्या डोंगरावरून दिसणारे गंगटोक)

जाताना रस्त्यांत संपूर्ण डोंगर व्यापणारे गंगटोक शहर डोळ्यात व कॅमेऱ्यात साठवून मोनॅस्ट्री पाहायला गेलो. सदर मोनॅस्ट्रीची सुरक्षा इंडो-तिबेटीअन-बोर्डर-पोलिसांकडे असल्याने आम्हाला प्रत्येकाला फोटो आयडी काढायला सांगितली, व मगच आत प्रवेश दिला गेला. सदर मोनॅस्ट्रीमध्ये 'जागतिक-धर्मचक्र-केंद्र' आहे व तेथे तिबेटींन बौद्ध धर्माचे मुख्य 'करमापा' रहात, पाठीमागे 'नालंदा-इन्स्टिटीट्यूट-ऑफ-बुद्धीस्ट-स्टडीज' जेथे जगभरातून विद्यार्थी बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी येतात. रूमटेकचा प्रचंड व्याप पाहून डोळे दिपलेच.

रूमटेक मोनॅस्ट्री

सदर मोनॅस्ट्रीमध्ये फिरताना अनेक लामांना बोलते करण्याचा प्रयत्न केला परंतु कोणीही काहीही बोलण्यास तयार नव्हते, फिरताना तासभर कसा गेला समजलेच नाही. आता खरं म्हणजे आम्हाला इन्स्टिटटीट्यूट-ऑफ-तिबेटोलोजी पाहायला जायचे होते परंतु रूमटेकलाच साडेचार वाजल्याने रिसोर्टवर परतलो. सोबतचे सारेजण 'फन झोन' मध्ये विविध खेळ, अंताक्षरी वगैरे साठी गेलेले असताना साडेसातच्या सुमारास रूममधला फोन खणखणला व ट्रॅव्हल-डेस्कच्या माणसाने उद्यालाही नथुला पासला जाता येणार नाही असे सांगून फोन बंद केला. रात्री डिनरला ऑर्किड रेस्तराँत व्हेज व नॉनवेज पदार्थांची रेलचेल होती, परंतु स्थानिक पदार्थ काही दिसेना. अखेर ऑर्कीडच्या फ्लोर-मनेजरकडे त्याबाबत विचारणा केली, तर त्याचे असे म्हणणे की येथे सर्वात जास्त गुजराथी ग्रुप्स येतात, आम्ही शक्यतो शनिवारी रात्री स्थानिक पदार्थ बनवतो, 'आम्ही तर शनिवारी सकाळीच निघणार' मी आमची अडचण सांगितली, 'हरकत नाही, मी उद्याच संध्याकाळी 'तुप्पा' बनवतो',

गुरुवारीही नथुला पासचे परमिट न मिळाल्यामुळे सकाळी केवळ एम जी रोडवर शॉपिंगला जायचे होते. ते सुद्धा १० च्या सुमारास. तेव्हा साडेपाच पावणे सहाच्या सुमारास कॅमेरा घेऊन रिसोर्ट भोवतीचा परिसर पाहायला निघालो. रिसोर्टच्या दरवाज्यातच ५-६ कुत्र्यांनी त्यांच्या दृष्टीने अनपेक्षित पाहुण्याचे म्हणजे माझे तारस्वरात गर्जत स्वागत केले. परत रूमवर जावं की पुढे जावे म्हणून थोडासा घुटमळलो तर कुत्र्यांच्या फौजेला जोर चढला. अखेर मनाचा हिय्या करून पुढे गेलो. रिसोर्ट मधून बाहेर येऊन डाव्या बाजूचा रस्ता गाठला. रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या घरांत लगबग अशी काही दिसली नाही. थोडेसे पुढे गेल्यावर एक रेसिडेन्शियल शाळा दिसली तिकडे शिक्षकांसकट विद्यार्थी शेकोटी करून बसलेले दिसले व शाळेतून गेलेल्या सहलीची आठवण झाली. तसेच पुढे गेल्यावर एक स्तूप दिसला, दबकत दबकत चढून गेलो तर कोणीच दिसेना. संपूर्ण स्तुपला चक्कर मारून परतलो, मनसोक्त फोटो काढले, कुणीही मला दिसले नाही की कुणी हटकले नाही. परत स्तूप पाहून खालती उतरलो व स्तूपाला वळसा घालून मागील बाजूला गेलो.

मी जेथे उभा होतो तेथून गाव हे असे दिसत होते

खोल दरीत पन्नास एक घरांचे एक गाव दिसले, मी जेथे उभा होतो त्याच्या जवळच काही भाज्यांचे दोन हारे, दुधाचा कॅन व पाण्याची बाटली होती, आजूबाजूला कोणीही नव्हते, पाच एक मिनिटांनी, एक 'कांचा' (ह्या बाबाला मी दोनदा त्याचे नाव विचारले, त्यानेही न चुकता दोनदा ते सांगितले, मला काही ते समजले नाही, मी त्याला 'कांचा' म्हणून संबोधले त्यालाही त्याने आक्षेप घेतला नाही) दुरून येताना दिसला, त्यातला एक भाज्यांचा हारा व दूध त्याचेच होते व तो, ते दरीतील गावात घेऊन चालला होता, 'तो आप इसे छोडके जाते हो तो कोई चोरी वोरी का डर नाही लागता? 'मी आपला माझ्या बुद्धीला साजेसा प्रश्न विचारला. 'शाबजी, कोई नही लेके ज्याता. मै तो यहा हमेशा तरकारी रखके जाता हूँ.' त्याने पुरवलेल्या माहितीनुसार, दरीत बुभूता गाव व जवळच वाहणाऱ्या ओढ्यात वरच्या बाजूला डोंगरावर असणाऱ्या १५ मिलचे (ह्या भागात ३रा मिल, ७वा मिल १५ मिल असे टप्पे आहेत) बर्फ वितळून येणारे पाणी येते. अगदी सिनेमात, किंवा कथा कादंबरीत असल्यासारखी लोकेशन, 'सुहाना सफर और ये मौसम हसीन....' तसेच काहीसे. जागेवरून हलावेसेच वाटेना. परतीच्या मार्गावर पुन्हा शाळा लागली, सारे 'नोबिता, शिज़ुका, मियोको, हिमावरी, जियान, सुनियो'

दप्तरे सांभाळत लगबगीने जाताना दिसले. इकडे का कुणास ठाऊक कुठल्याशा नाटकातले ‘एकदा का बंगाल ओलांडला की पिवळा रंग व चपटी नाके बरे का‘ उगीचच आठवले.

शेवटी रिसोर्टच्च्या जवळच एका छोट्याश्या हॉटेलात, चहा मारला आणि परतलो. तगडा नाश्ता करून टाक्सीने शॉपिंगसाठी एम.जी.रोड गाठला. पु.लं.नी म्हटल्याप्रमाणे पुण्याचा लक्ष्मीरोड व दादरचा रानडेरोड ह्या दोन्ही ठिकाणी जगात मिळणारे काय मिळत नाही? तेव्हा शॉपिंगला रामराम करून मी एम.जी.रोडवर हिंडू लागलो.

ऊन खात मस्त पैकी गप्पा मारणारे पाहिले व मनात विचार आला की ही मंडळी जीवन किती ‘एन्जोय’ करतात नाही का? पहाना, दुपारी बारा-एक वाजता कोवळ्या उन्हात भर रस्त्यात बाकावर बसून (एम.जी.रोडवर वाहनांना प्रवेश नाही बरे) हास्य विनोद करणे, मला तर हे स्वप्नवत वाटले. वानगीदाखल काही फोटो देत आहे. पुन्हा चारच्या सुमारास रिसोर्टवर परतलो. रात्रीच्या भोजनाला ‘ऑर्किड रेस्तोराँ’ मध्ये जाऊन मेनू पाहत असतानाच कालचा फ्लोअर-मनेजर माझ्या दिशेने येऊन म्हणाला, ‘ सर, युअर तुप्पा सूप इज रेडी‘. आम्ही सारेच् एकदम स्तिमित वगैरे झालो. जेऊन आम्ही ट्रॅव्हल-डेस्कला गेलो, तो त्याने उद्या नथुला-पासला जाण्याचे परमिट मिळाल्याचे सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेआठ वाजता भरपूर नाश्ता करून व सोबत नथुला साठी सॅन्डविचेस वगैरे कोरडा नाश्ता घेऊन नथुला साठी निघालो.

पहिल्या फोटोत सुरुवातीचा चेक पोस्ट तर पुढे नाथूलाला जाणारा रस्ता दिसत आहे.

निघताना रेसोर्टच्या डेस्कने गरम कपडे सोबत ठेवण्याचा सल्ला दिला, त्याप्रमाणे सारा जामानिमा घेऊन वर दाखविलेल्या रस्त्याने निघालो. आठवडाभर नथूलाचा रस्ता खराब हवामानाने बंद होता तो आजच उघडला व एकदम ३००-४०० गाड्या नथुलाच्या दिशेने निघाल्या. सव्वानवाच्या सुमारास आम्ही ३ मैल चेकपोस्टवर आमच्या गाडीचे रिपोर्टिंग केले. आमच्या रिसोर्टपासून नथुला फक्त ५६ किलोमीटर, म्हणजे तीन एक तासावर, पण गंगटोक सोडून दोन तीन किलोमीटर जात नाही तोच, गाडीने एअर पकडायला सुरुवात केली. आमचा चालक गोंधळून गेला. अनेक सह–चालक थांबले प्रत्येकाने आपआपली बुद्धी वापरली, पण गाडी थोडीशी पुढे गेल्यावर पुन्हा पुन्हा रुसू लागली, बरे रस्ता तर इतका भयंकर व अनेक ठिकाणी खचलेला, दोनदा तर निर्जन अशा रस्त्यावर आमची बंद पडलेली गाडी व आम्ही, काहीच सुचत नव्हते, (संपूर्ण परिसरात मिलीटरीची गस्त असल्याने चोरीमारीची अजिबात भीती नव्हती) हो. आता नथुला पाहून परतणारे पर्यटक देखील दिसू लागले, तेदेखील थांबत होते, आपल्या परी मदत करीत होते. नथुलाच्या दुसऱ्या चेकपोस्ट आधी दोन एक किलोमीटरवर एक बोर्ड वाचला "तुमच्यावर चीन नजर ठेऊन आहे, थांबू नका, वाहनातून उतरू नका." आम्ही हबकलोच, अरे आमच्या देशात चीन आमच्यावर लक्ष ठेऊन? नंतर समजले जसा चीन भारतीय रस्त्यांवर लक्ष ठेऊन असतो तसाच भारत ही तिबेटहून येणाऱ्या रस्त्यावर पाळत ठेवतो. परंतु तिबेटमधून नथुला पाहायला कोणीच येत नाही. दुपारी एकच्या आधी नथुलाचे चेकपोस्ट कसे गाठणार ह्या भीतीने आमचाही आता धीर खचू लागला. कारण, दुपारी दोन वाजता भारत-तिबेट (आताची चीन) सीमा पर्यटकांना बंद होते. अखेर दीडच्या सुमारास नाथूलाचे दुसरे चेकपोस्ट गाठणारी बहुधा आमची शेवटची गाडी असावी. "सवा नौ बजे निचंली

पोस्ट पर रिपोर्ट हुआ है, अबतक क्या कर रहे थे?" तगड्या सरदारजीच्या प्रश्नाने आम्ही हबकून गेलो. चालकाने "शाबजी, गाडी का प्रोब्लेम है, बम्बैवाले है" वगैरे रदबदली केली, "ठीक है, उनको बोलो जल्दी आवे." मधल्या काळात आमच्या आजूबाजूचा निसर्ग केव्हा बदलला हे आमचे आम्हालाच समजले नाही. निघालो तेव्हा आजूबाजूला हिरवी कंच झाडी होती, तर आता जेथे पाहावे तेथे बर्फच बर्फ. खरंच निसर्गाचा महिमा भन्नाटच म्हणावा असाच. पुढील दहा मिनिटात आम्ही नथूलाच्या दारात पुढील बोर्ड वाचत होतो.

चहूकडे बर्फच बर्फ व जोरदार वारे. मी भराभर २०-२५ पायऱ्या चढून गेलो हातात कॅमेरा होता ग्लोव्स नव्हते, हाताचा पंजा अक्षरशः बधीर झाला. शेवटी कॅमेऱ्यासकट हात खिशात खुपसून वाऱ्याकडे पाठ करून उभा राहिलो. श्रावणीला श्वास घ्यायला त्रास सुरु झाला, लगेच भारतीय सैन्यदलाच्या जवानांनी तिला बसवले, पाणी वगैरे देऊन सल्ला दिला, 'बेह्नजी, आप इतनी दूरतक आई हो तो धीरे से चलिये, उपरतक जाईये, कोई जल्दी नही है' असे म्हणून धीर दिला. ती हळू हळू सीमा रेषेवर पोहोचली व भारतीय व चीनी सैनिकांशी हस्तांदोलन करून परतली. आम्ही साधारणतः अर्धा ते पाउण तास त्या भागात होतो, एक डिग्री तापमानात आमची कुल्फी झाली तर ह्या अशा वातावरणात सैन्यदल बारा महिने तेरा काळ सतत डोळ्यात तेल घालून कसे उभे रहाते ते पाहून समोर सैनिक दिसताच नकळत 'जय हिंद' हे शब्द तोंडातून बाहेर येत होते. जाणवलं ही सारी मंडळी आपल्या घरापासून, शहरापासून, माणसांपासून ऊन, वारा, पाऊस, बर्फ झेलत कशाचीही पर्वा न करता, कशाचीही अपेक्षा न ठेवता, आपले संरक्षण करतात.

वरती डावीकडे: फ्लॅग-मिटींगची जागा, मेमोरिअल, भारतीय सैनिकांसोबत

हिंदी - चीनी भाई भाई. चीनी टेहेळणी बुरुज.

नथुला मेमोरिअलवर ती लिहिलेली १८ राजपूत रेजिमेंटच्या शहिदांची नावे वाचताना तसेच खाली लिहिलेले "When you go home, tell them of us, and say, for your tomorrow we gave our today." वाचणारे आपोआप नतमस्तक होत होते. प्रसिद्धीपराङमुख असे खरेखुरे हिरो आम्ही प्रथमच पाहत होतो. शक्य होईल तितक्याशी हस्तांदोलन करीत होतो. त्यांच्या बरोबर फोटो काढीत होतो. सारे पर्यटक एकदम भारल्यासारखे झालेले होते, अखेर पावणे तीनच्या सुमारास सैन्यदलाने आम्हा रेंगाळलेल्या पर्यटकांना त्सांगो-लेककडे पिटाळले. गाडीत येऊन बसलो तेव्हा लक्षात आले आम्ही जेवलोच नव्हतो, अखेर गाडीत बसल्याबसल्याच अन्न भक्षण केले. येथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की एरवी संपूर्ण सिक्कीममध्ये आम्हाला प्लास्टिक अथवा कचऱ्याचे ढीग दिसले नाहीत परंतु नथुलाला पर्यटकांनी टाकलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या पाहणे उद्वेगजनक होते. नथुलाहून आम्हाला खरे म्हणजे बाबा हरभजन मंदिर पाहायला

जायचे होते. हरभजन सिंग हे १८ राजपूत रेजिमेंटचे शिपाई, १९६७ च्या सप्टेंबर मध्ये चीनसोबत झालेल्या झटापटीत कामी आलेले. त्याच्या सहकाऱ्यांनी त्यांना संतत्व बहाल केले. त्यांच्या नावाचे मंदिर उभे केले. जिथे त्यांच्या कपड्यासकट साऱ्या गोष्टी ठेवण्यात आल्या. आजही असे मानले जाते की बाबा हरभजन आपल्या सैनिकांचे रक्षण करतात. विचित्र वाटत होते. परंतु आम्ही हे सारे ऐकून भारून गेलो होतो. पुन्हा गाडीने आचके द्यायला सुरुवात केली व आम्हाला बाबा हरभजन सिंग मेमोरिअल मंदिर पाहण्याचा बेत रद्द करावा लागला.

रस्त्यात एलीफंट लेक तसेच त्सांगो-लेक पहिला. निसर्गाचा चमत्कार म्हणजे एवढ्या थंडीत (दिवसा एक डिग्री व रात्री उणे ५ ते ६ डिग्री) देखील दोनीही तलावांचे पाणी गोठलेले नव्हते, त्सांगो-लेकच्या शेजारी याक हा अती थंड प्रदेशात दिसणारा प्राणी दिसला. मंडळी त्या सोबत आपले फोटो काढत होते, आम्ही मात्र त्याला दया दाखवली व नुसतेच फोटो काढले. रिसोर्ट वर येईपर्यंत सर्वत्र अंधाराचे साम्रान्य पसरले होते. रिसोर्टवर गेल्यावर हेमंतने ट्रॅव्हल-डेस्कच्या प्रेमा नावाच्या बाईना चांगलेच फैलावर घेतले. विना-थांबा प्रवासाने सारेच थकून गेले होतो परंतु, एक वेगळा अनुभव, सैनिकांचे एक वेगळे विश्व पाहायला मिळाल्याचे समाधान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होते. उद्या सकाळी मुंबईकडे प्रयाण करायचे म्हणून साडे सातच्या सुमारास रिसोर्ट सोडायचे तेव्हा 'याचसाठी केला होता अट्टाहास, शेवटचा दिस गोड व्हावा (नाही, झालाच).' असे काहीसे पुटपुटत निद्राधीन झालो. कारण गंगटोक पर्यंत जायचे आणि नथुला न पाहता परतायचे ही कल्पनाच सहन होणारी नव्हती व पुढे सतत बोचत राहिली असती.

दुसऱ्या दिवशी पुन्हा निसर्गाचा निरोप घेत बागडोग्रा गाठले, तेथून दिल्ली व दिल्लीहून मुंबई असा तीन हजार किलोमीटरचा प्रवास करून मुंबईत (१,६०० च्या आसपास छायाचित्रे व अनेक छान आठवणी घेऊन) परतलो अजून पश्चिम, उत्तर सिक्कीम पहायचे आहे ते पुन्हा पाहायला येण्याचा निश्चय करूनच.